CNR No. MHRG040018582019

## नियमित दिवाणी दावा क्र.३४२/२०१२ निशाणी क्र.१३४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२/२, २/४ ते २/१० यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे. वादींनी निशाणी क्र.१५८ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. अर्जातील थोडक्यात कथन असे की, वादींनी सदरहू दावा ठराव व मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला असुन दाव्यास व निशाणी क्र.५ च्या अर्जास रेस ज्युडीकेटा या तत्वाची हरकत आहे. वादींनी सदर दावा मिळकतीबाबत यापुर्वी हक्क प्रस्थापनेसाठी, तसेच तुर्तातुर्त व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता पनवेल येथे नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ दाखल केला होता व त्याचा निकाल दिनांक १६/०३/१९९६ रोजी वादींच्या विरूध्द देण्यात आला असुन सदर निकालाविरूध्द वादींनी अपील क्र.११२/१९९६ दाखल केले होते व ते दिनांक ०६/०८/१९९७ रोजी नामंजुर करण्यात आले असुन नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ चा निकाल कायम करण्यात आला. त्यानंतर दिनांक १७/०१/१९९८ रोजी वादींनी सदरहू दावा दाखल केलेला आहे. वादींनी त्याच कारणासाठी व त्याच मिळकतीबाबत नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ दाखल करून तो निकाली असताना दुसरा दावा दाखल केल्याने सदर दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ११ च्या तरतुदींची बाधा असल्याने दावा फेटाळण्यास पात्र आहे. सदर दाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७

नियम ११(अ) च्या तरतुदींची बाधा आहे. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नसुन दाव्यातील परिच्छेद क्र.१४ व १९ मधील नमुद केलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. वादींच्या म्हणण्याप्रमाणे दिनांक १६/१२/१९९७ रोजी दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. दावा दाखल करण्यापुर्वी वादींनी या प्रतिवादींना नोटीस दिल्याबाबत कोणताही उल्लेख दाव्यात नसुन वादींनी या प्रतिवादींना कोणतीही नोटीस पाठविलेली नसल्याने दावा फेटाळण्यास पात्र आहे. दाव्यास हिंदु वारसा कायद्याची बाधा असुन सन १९५८ पासुन वादी व प्रतिवादी यांचे पुर्वगामी खंडू पाटील यांचे एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप झालेले आहे. सदर मिळकतीबाबत प्रतिवादींविरूध्द दावा करण्याचा व ठराव करून मागण्याचा अधिकार वादींना हिंदु वारसा कायद्यानुसार असल्याने सदर कायद्याची बाधा आहे. दाव्यास महसुल कायद्याच्या तरतुदींची व एम.आर.टी.पी. कायद्याच्या तरतुदींची बाधा असुन वादींना सन १९५८ नंतर दावा मिळकतीत हक्क मागण्याचा अधिकार नाही.

३. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ यांच्या नावे सातबारा उतारे व फेरफार नोंदी झालेल्या असुन वादींनी कोणत्याही फेरफार नोंदीस हरकत घेतलेली नसुन सदर दाव्यास महसुल कायद्याची बाधा आहे. दावा दाखल करण्यापुर्वी वादींनी प्रतिवादी क्र.५ यांना एम.आर.टी.पी. कायदा, कलम १५९ (अ) नुसार विहीत नमुन्यात कोणतीही सक्तीची नोटीस दिलेली नसुन दाव्यास एम.आर.टी.पी. कायद्याची बाधा आहे. दावा मिळकती या सिडकोने योग्य त्या कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून आवश्यक त्या नोटीसांची बजावणी करून भुसंपादीत केल्या असल्याने वादींना सदर दावा दाखल करून भुसंपादनास व ॲवॉर्डला आव्हानीत करता येत नसुन त्यासाठी या न्यायालयास न्यायक्षेत्र नसुन दाव्यास भुसंपादन

कायद्याच्या तरतुदींची बाधा आहे. वादींनी महत्वाची वस्तुस्थिती न्यायालयापासुन लपवुन ठेवली असुन वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आलेले नाहीत. दावा मिळकतीचे सन १९९८ मध्ये वाटप झाल्याने सदर दावा मिळकती या एकत्र हिंदु कुटूंबाच्या अविभक्त मिळकती नव्हत्या व त्याचे सरस–निरस मानाने वाटप झालेले आहे. सदर बाब वादींनी लपवुन ठेवल्याने वादींना दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण राहिलेले नसुन दाव्यातील कोणत्याही मागणीस वादी हक्कदार नाहीत. दाव्याचे मुल्यांकन चुकीचे केले असुन त्यावर दिलेला कोर्ट फी स्टॅम्प अपुरा आहे. वादींना अपुरा राहिलेला कोर्ट फी स्टॅम्प भरण्याचा हुकूम व्हावा अन्यथा दावा नाकारण्यात यावा. वादींचा दावा दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ७, नियम ११ नुसार फेटाळण्यात यावा.

४. वादींनी निशाणी क्र.१५८ वरील त्यांच्या जबाबात कथन केले आहे की, अर्जात उपस्थित केलेला रेस ज्युडीकेटा या तत्वाचा मुद्दा हा कायद्यातील तरतुदी व वस्तुस्थिती यांचा संमिश्र मुद्दा असुन त्याबाबत दाव्यात पुरावा नोंदवुन गुणवत्तेवर निकाल होणे अनिवार्य आहे. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ व त्याविरूध्द दाखल झालेले दिवाणी अपील क्र.११२/१९९६ मध्ये झालेल्या निकालांमुळे वादींना दावा दाखल करण्याचा अधिकार आहे किंवा कसे ही बाब पुराव्याअंती निष्कर्षीत केली जाऊ शकते. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ चा निकाल हा विना कैफियत झालेला असुन त्या दाव्याचा निकाल हा गुणवत्तेवर झाल्याचे म्हणता येणार नाही. त्या दाव्याच्या कामी वादी, प्रतिवादींमध्ये तडजोड झालेली होती व तशी तडजोड पुरशीस त्या दाव्यात दाखल केली होती. त्या दाव्यात गुणवत्तेवर निकाल दिलेला नसुन त्या निकालाविरूध्द दाखल केलेल्या दिवाणी अपील क्र.११२/१९९६ या अपीलाच्या कामी

सिडकोकडून १२.५% योजनेतुन भुखंड अपील चालु असताना वितरीत झालेला नसल्याने नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ चा दावा अपरिपक्व असल्याचा निष्कर्ष मा. जिल्हा न्यायालय यांनी काढून अपील फेटाळले होते, म्हणजे तो दावा व त्यावरील अपीलाचा निकाल गुणवत्तेवर झालेला नसल्याची बाब स्पष्ट आहे. रेस ज्युडीकेटाचे तत्व प्रस्तुत दाव्यास लागु होत नाही. प्रस्तुत दाव्यास कारण घडले अथवा नाही ही बाब पुराव्याअंती विचारात घेता येऊ शकते. वादींनी दाव्यात दाव्यास घडलेल्या कारणाचा उहापोह केलेला असुन प्रस्तुतचा दावा वादींनी त्यांचा १/२ अविभक्त हिस्सा ठरवुन मिळण्यासाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादींना दावापुर्व नोटीस देण्याची आवश्यकता नाही. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे पुर्वी वाटप झाले होते किंवा कसे हे पुराव्याअंती ठरू शकते. हिंदु वारसा कायद्यानुसार १९५८ नंतर वादींना हिस्सा मागण्याचा अधिकार येतो किंवा कसे ही बाब पुराव्याअंती ठरू शकते. हिंदु वारसा कायद्यामध्ये झालेल्या दुरूस्तीचा विचार करता प्रस्तुत प्रतिवादींना सदर अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. एम.आर.टी.पी. कायद्याच्या कलम १५९ प्रमाणे नोटीस दिली अथवा कसे व नसल्यास परिणामाबाबतची तक्रार करण्याचा प्रस्तुत प्रतिवादींना अधिकार नाही. वादींनी भुसंपादनाची प्रक्रिया त्याबाबत झालेल्या निवाडयाबाबत कोणतेही आव्हान दिलेले नसुन वादींनी त्यांचे मालकी हक्क ठरवुन मिळण्यासाठी विनंती केल्याने दाव्याची चौकशी करण्याचा दिवाणी न्यायालयास अधिकार आहे. वादींनी किती आकारणी करणे आवश्यक असुन किती मुद्रांक देणे आवश्यक आहे याचा तपशील अर्जात देणे अनिवार्य होते. तसा तपशील अर्जात दिलेला नसल्याने त्या मुद्दयावरून मुद्रांक भरण्याचा हुकूम करून मागण्याचा अथवा दावा नाकारून मागण्याचा प्रस्तुत प्रतिवादींना अधिकार नाही.

५. प्रतिवादी क्र.२/२, २/४ ते २/१० यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, वादींनी पुर्वी नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ व दिवाणी अपील क्र.११२/१९९६ दाखल केले असुन ते फेटाळण्यात आल्याने दाव्यास रेस ज्युडीकेटाची बाधा असुन दाव्यास कारण घडलेले नाही. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, वादींनी दावा दाखल करण्यापुर्वी एम.आर.टी.पी. कायदा, कलम १५९(अे) ची नोटीस पाठविलेली नसुन वादी व प्रतिवादींचे पुर्वगामी खंडू पाटील यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकतीचे वाटप झाले असुन वादींना ठराव करून मागण्याचा अधिकार नसल्याने दाव्यास हिंदु वारसा कायद्याची बाधा आहे. वादींनी कोणत्याही फेरफार नोंदीस हरकत घेतली नसुन दाव्यास महसुल कायद्याची, तसेच दावा मिळकतीत कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करून संपादीत झाल्याने भुसंपादनास व अॅवॉर्डला आव्हानीत करता येत नसुन या न्यायालयास त्याबाबत न्यायक्षेत्र नसुन वादींनी वाटप झाल्याची बाब न्यायालयापासुन लपवुन वादी स्वच्छ हाताने न्यायालयात आलेले नसुन अपुरा कोर्ट फी स्टॅम्प दिल्याने दावा फेटाळण्यात यावा. त्यांनी निशाणी क्र.२१७ अन्वये लेखी युक्तीवाद दाखल केला. त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा निर्वाळा दिला.

**1) Ajay Mohan & Ors. Vs. H. N. Rai & Ors., AIR 2008 SUPREME COURT 804,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Only because further prayer had been made in suit upon amending plaint, the same by itself did not bring about situational change warranting application of mind afresh by Court."*

**2) Jaison Dias Vs. Mr. Ramesh Ramchandra Pawar & Ors., 2016(1) ALL MR 45,** wherein, the Hon'ble Bombay High Court, Panaji Bench observed that,

> *"While exercising powers under O.7 Rr.11(a) and (d), court has to confine itself to allegations in plaint and documents, if any produced. It cannot have recourse to any defence actual or probable. Plaint as it stands, should appear to be lacking cause of action or barred by law. No enquiry or asssessment of material is contemplated at this stage."*

**3) Saleem Bhai and others, Vs. State of Maharashtra and others, 2002 STPL 18046 SC,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"The court can exercise such power at any stage of suit. Averments in plaint were germane and pleas taken by defendant in written statement would be holly irrevalant. Therefore, direction to file the written statement without deciding the application under O.VII, Rr. II of C.P.C. be procedural irregularity.*

**4) Church of Christ Charitable Trust & Educational Charitable Society, represented by its Chairman Vs. M/S. Ponniamman Educational Trust represented by its**

**Chairperson/Managing Trustee, 2012(6) Mh.L.J. 738,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"If clever drafting has created the illusion of a cause of action, it should be nipped in the bud at the first hearing by examining the parties under Order X."*

**5) Govind Goverdhandas Daga and another Vs. Field Mining and Ispat Ltd., Nagpur, 2009(6) Mh.L.J. 398,** wherein, the Hon'ble Bombay High Court, Nagpur Bench observed that,

> *"When a party alleges that the plaint should be rejected under Order 7 Rule 11(d), it must show a provision in a particular leglislation prohibiting Civil Court from entertaining the dispute or it must show from the scheme of the act that an alternate forum and remedy is provided."*

**6) M/s. Anand Laxmi Enterprises Vs. Vasant Balu Mhatre & Ors., 2009(1) ALL MR 23,** wherein, the Hon'ble Bombay High Court observed that,

> *"No period of limitation can be extended after the claim gets barred by limitation. The very expression "Limitation" implies limitation of time to sue. Right to sue cannot go on endlessly. If that were allowed, a very strange, unjust consequence would arise."*

**7) Shri. K. Jayaram & Ors. Vs. Bangalore Development Authority & Ors., Civil Appeal No.(s) 7550-7553 of 2021**

**(Arising out of S.L.P.(C) No.(s) 26374-26377 of 2013)** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"Since the appellants have not disclosed the filing of the suit and its dismissal and also the dismissal of the appeal against the judgment of the civil court, the appellants have to be non-suited on the ground of suppression of material facts. They have not come to the court with clean hands and they have also abused, the process of law. Therefore, they are not entitled for the extraordinary equitable and discreationary relief."*

8) **Commissioner, Bangalore Development Authority & Anr. Vs. Brijesh Reddy & Anr., 2013(3) Mh.L.J. 880,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"The Land Acquisition Act is a complete Code in itself and is meant to serve public purpose. By necessary implication, the power of civil Court to take cognizance of the case u/s 9 CPC stands excluded."*

9) **Sima Hotels & Resorts Ltd. Vs. Dugal Projects Development Company Pvt. Ltd., 2013(3) ALL MR 65,** wherein, the Hon'ble Bombay High Court, Panaji Bench observed that,

> *"The issue of limitation raised by the petitioner based on Section 9 of the Limitation Act goes to the*

*route of the matter."*

**10) Shahid S. Sarkar & Ors. Vs. Mangala Shivdas Dandekar & Ors., 2019(1) ALL MR 129,** wherein, the Hon'ble Bombay High Court observed that,

> *"When suit appears from averment in plaint to be barred by any law, Courts will not unnecessarily protract litigation and proceed with hearing of suit as device to harass defendant."*

**11) C. S. Ramaswamy Vs. V. K. Senthil, Civil Appeal No.502 of 2022,** wherein, the Hon'ble Supreme Court observed that,

> *"When the allegations made in the plaint are taken to be correct as a whole on their face value if they show that the suit is barred by any law or do not disclose cause of action, the application of rejection of plaint can be entertained and the power under O.7 Rr. 11 of CPC can be exercised."*

**12) Shaikh Vazir Ahmad Mulla(D) thr. LRs. & Anr. Vs. Bansi Kalu Sangamnere(D) thr. LRs. & Ors., 2016(7) ALL MR 685,** wherein, the Hon'ble Bombay High Court observed that,

> *"Though no order passed on application to bring legal heirs on record, legal heirs of deceased tenant participated in all proceedings under Act and*

*availed full opportunity and had taken chance of succeeding in a challenge before Competent Authority and Court. Therefore, merely because no order passed on application to bring legal heir on record, proceedings would not abate. Eviction of tenant proper."*

६. वादी यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ गुणवत्तेवर निकाली झाला नसुन दोन्ही दावे निराळे असुन दाव्यास रेस ज्युडीकेटाची बाधा नसुन दावा मिळकतीचे वाटप झाल्याचे अभिलेखावर पुरावा आल्याशिवाय ठरविता येणार नाही. त्यांनी यापुढे प्रतिपादन केले की, दाव्यास घडलेले कारण दाव्यात नमुद केले असुन वादींनी त्यांच्या हक्काकरिता दावा दाखल केल्याने प्रतिवादींना पुर्व नोटीस पाठविण्याची आवश्यकता नसुन दाव्याचे मुल्यांकनाबाबतचा तपशील प्रतिवादींनी दिलेला नसुन दाव्याचे मुल्यांकन वादींनी योग्य केलेले असल्याने अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा. त्यांनी खालील न्यायनिर्णयांचा निर्वाळा दिला.

७. अभिलेखाचे अवलोकन करता, तसेच वादी व प्रतिवादी क्र.२/२, २/४ ते २/१० यांचे वि. अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा, वादी कृष्णा बाबू पाटील (मयत) कायदेशीर वारस मुक्ताबाई कृष्णा पाटील, जयराम कृष्णा पाटील (मयत) कायदेशीर वारस हिराबाई जयराम पाटील, मयुरेश जयराम पाटील, आयुश जयराम पाटील, पार्थ जयराम पाटील, राजाराम कृष्णा पाटील, दिलीप कृष्णा पाटील, अनिता कृष्णा पाटील, ताराबाई अनंता पाटील, सुनिल अनंता पाटील, रणधीर अनंता पाटील तर्फे ताराबाई अनंता पाटील यांनी ताराबाई

काशिनाथ पावसे, काशिनाथ माधव पावसे (मयत) वारस ताराबाई काशिनाथ पावसे, केशव काशिनाथ पावसे, कैलास काशिनाथ पावसे, श्रीधर काशिनाथ पावसे, राकेश काशिनाथ पावसे, लताबाई मंगलदास माळी, कांताबाई बाळाराम पाटील, लक्ष्मी मोहन म्हात्रे, वंदना रघुनाथ मढवी, अप्सरा काशिनाथ पावसे, बाबीबाई लक्ष्मण मयेकर (मयत) वारस कृष्णा लक्ष्मण मयेकर, हिराबाई तुकाराम पाटील, मुख्य भूमी चिफ लॅन्ड सर्व्हे ऑफीसर, लॅन्ड विभाग, सिडको लि., मे. राजहोम्स पिरॅमिड ग्रुप, हली आबा पाटील उर्फ शर्मिला शिवराम पाटील, सुभाष काळु उर्फ काळुराम म्हात्रे, बाळाराम काळु उर्फ काळुराम म्हात्रे, जिजाबाई काळुराम म्हात्रे, द्रौपदी वसंत पाटील, बळीराम आंबो लोखंडे यांचेविरूध्द दाखल केल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा दावा वादींनी दिनांक १६/०१/१९९७ रोजीच्या वाटपपत्रान्वये प्रतिवादी क्र.५ यांनी १२.५% योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या दावा मिळकतीच्या मोबदल्यातील भुखंडात वादींचा अर्धा हिस्सा आहे हे जाहीर करण्याकरिता, तसेच विशेष दिवाणी दावा क्र.५८७/२००६ मधील प्रतिवादी क्र.१ ते ४ व ६ यांच्यामधील तडजोड वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करण्याकरिता व दिनांक ०६/०१/२००६ व दिनांक ०९/०४/२००७ रोजीचे प्रतिवादी क्र.१ ते ४ व प्रतिवादी क्र.६ यांच्यातील विक्री करारनामे कायदेशीर व वैध नसुन वादींवर बंधनकारक नसल्याचे जाहीर करून मिळण्याकरिता व प्रतिवादी क्र.१ यांनी त्रयस्थ इसमांचे हक्क व हस्तांतरण करू नये, तसेच प्रतिवादी क्र.५ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या लाभात पंचलड येथील भुखंडाचे भाडेपट्टा करू नये असा मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. दिवाणी अपील क्र.२१६/२०१३ चा हुकूमनामा अभिलेखावर दाखल असुन सदरहू अपील ताराबाई काशिनाथ पावशे, केशव काशिनाथ पावशे, कैलास काशिनाथ पावशे, श्रीधर काशिनाथ पावशे, राकेश काशिनाथ

पावशे यांनी मे. राजहोम्स पिरॅमिड ग्रुप, राज मोतीलाल कंधारे, संदीप सखाराम पाचपुते, मोहन गणपत दांगट व सिडको यांच्याविरूध्द केल्याचे दिसुन येते.

८. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ कृष्णा बाबू पाटील, ताराबाई अनंता पाटील, सुनिल अनंता पाटील, रणधीर अनंता पाटील यांनी ताराबाई काशिनाथ पावशे, काशिनाथ माधव पावशे, बबीबाई लक्ष्मण मयेकर, हिराबाई तुकाराम पाटील, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी सिडको मर्यादित यांचेविरूध्द दावा मिळकती संबंधातील १२.५% प्रमाणे निवासी भुखंडात वादींचा अर्धा मालकी हक्क व हिस्सा असुन अर्ध्या हिश्श्याची निवासी भुखंडाचे ॲलॉटमेंट व ताबेकब्जा मिळण्याचा वादींना कायदेशीर अधिकार असल्याचे व दावा मिळकतीसंबंधातील भुसंपादन अधिनियम, कलम १८ व २८अ प्रमाणे दाखल केलेला रेफरन्स अर्जान्वये मिळणाऱ्या अपेक्षित नुकसानभरपाईच्या रकमेत वादींचा अर्धा हिस्सा असुन वादींना अर्ध्या हिश्श्याची नुकसानभरपाईची रक्कम मिळण्याचा कायदेशीर अधिकार असल्याच ठराव मिळण्याकरिता, तसेच प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकतीबाबत १२.५% योजनेप्रमाणे निवासी भुखंडापैकी अर्ध्या हिश्श्याचे भुखंडाचे ॲलॉटमेंट व ताबेकब्जा प्रतिवादी क्र.५ यांचेकडून घेऊ नये, तसेच प्रतिवादी क्र.५ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दावा मिळकतीबाबत १२.५ टक्के योजनेप्रमाणे निवासी भुखंडापैकी अर्ध्या हिश्श्याच्या क्षेत्राचे भुखंडाचे ॲलॉटमेंट व ताबेकब्जा देऊ नये व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी निवासी भुखंडाबाबत कोणत्याही प्रकारचा विक्री व्यवहार करू नये, त्रयस्थ इसमांचा हक्क निर्माण करू नये, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी अपेक्षित वाढीव नुकसानभरपाईमधील अर्ध्या हिश्श्याची रक्कम विशेष भुसंपादन अधिकारी, पनवेल रायगड अगर मा. जिल्हा न्यायालय, रायगड-अलिबाग यांचेकडून

घेऊ नये असा निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केल्याचे दिसुन येते. दिवाणी अपील क्र.११२/१९९६ हे कृष्णा बाबू पाटील, ताराबाई अनंता पाटील, सुनिल अनंता पाटील, रणधीर अनंता पाटील यांनी ताराबाई काशिनाथ पावशे, काशिनाथ महादेव पावशे, बबीबाई लक्ष्मण मवेकर, हिराबाई तुकाराम पाटील यांच्याविरूध्द केल्याचे दिसुन येते. सदरहू अपीलाचे दिनांक ०६/०८/१९९७ रोजीचे न्यायनिर्णय अभिलेखावर दाखल असुन त्यावरून अपील खर्चासह फेटाळण्यात आल्याचे दिसुन येते.

९. नियमित दिवाणी दावा क्र.२३/१९९५ मधील दाव्याचे कारण व सदरहू दाव्याचे कारण वेगवेगळे असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. दोन्ही दाव्यातील पक्षकार दावा मिळकत व मुद्दे रेस ज्युडीकेटा लागु होण्याकरिता समान असणे आवश्यक आहे. सदरहू मुद्दा हा कायदा व वस्तुस्थिती यांचा संमिश्र प्रश्न असुन अभिलेखावर संपुर्ण पुरावा आल्याशिवाय निष्कर्ष काढता येणार नाही.

१०. दावा दाखल करण्यास कारण म्हणजे संपूर्ण भौतिक तथ्यांचा समूह असुन दावा दाखल करण्यास कारण आहे अथवा नाही हा वस्तुस्थितीचा प्रश्न असुन वादींनी दाव्यातील परिच्छेद क्र.१९ मध्ये दावा दाखल करण्याचे कारण नमुद केले असुन वादींना प्रथमदर्शनी दावा दाखल करण्यासाठी कारण असल्याचे दिसून येते.

११. दाव्यात वादींनी मालकी हक्काचा जाहीर ठराव करून मागितलेला असुन दाव्यातील कथनांवरून दाव्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, चे कलम १५९(अे) ची बाधा असल्याचे

प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे पुर्वनोटीस नसल्याच्या कारणावरून या टप्प्यावर दावा फेटाळणे न्यायोचित होणार नाही.

१२. प्रतिवादी क्र.२/२, २/४ ते २/१० यांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, सन १९५८ पासुन वादी व प्रतिवादी यांचे पुर्वगामी खंडू पाटील यांच्या एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप झाले असुन सदर मिळकतीबाबत प्रतिवादींविरूध्द दावा करण्याचा अथवा ठराव करून मागण्याचा अधिकार हिंदु वारसा कायद्यानुसार नसुन दाव्यास हिंदु वारसा कायद्याची बाधा असुन वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नसुन वादींनी फेरफार उतारे आव्हानीत केले नसल्याने महसुल कायद्याच्या तरतुदीची बाधा आहे. अभिलेखावर संपुर्ण पुरावा आल्याशिवाय याबाबत कुठलाही निष्कर्ष काढता येणार नाही. वादींनी भुसंपादनास व ॲवॉर्डला आव्हानीत केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. दाव्याचे मुल्यांकन चुकीचे केले असल्याबाबत प्रथमदर्शनी कुठलाही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. उपरोक्त न्यायनिर्णयातील बाबी या हातातील प्रकरणातील बाबींपेक्षा निराळ्या असल्याने उपरोक्त न्यायनिर्णय हातातील प्रकरणास लागु होत नाही. दाव्यास कायद्याची बाधा असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत नसुन अशा परिस्थितीत दावा फेटाळणे न्यायोचित होणार नाही, परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**:: <u>आदेश</u> ::**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.02.27 16:38:00 +0530

पनवेल
दिनांकः २७/०२/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
पनवेल